# चांदवड पंचायत समिती, चांदवड जिल्हा नाशिक या संस्थेचा
# सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/३/ब/जिप/पंस.चांदवड/नाशिक/

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांकः-

**प्रेषक,**

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रति,**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

चांदवड पंचायत समिती, चांदवड, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. र. ह. झगडे, निवडश्रेणी लिपीक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ६.८.२००८ ते २५.८.२००८ या कालावधीत पूर्ण केले. या अहवालावर चर्चा करुन अहवालाचे पुनर्विलोकन श्री. सु. ध. ठाकरे, लेखा परीक्षा अधिकारी (प्रभारी) यांनी दिनांक ११.९.२००८ रोजी केले व अंतीमीकरण श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २३.९.२००८ रोजी केले.

लेखापरीक्षीत आर्थिक वर्षाच्या कालावधीत खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

**सभापती**

| | |
|---|---|
| श्री. अरविंद दामोदर रकीबे | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री. लोखंडे एस. सी. | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखापरीक्षण )

मागील लेखापरीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ. नं. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकुण परि. |
|---|---|---|---|
| १ | १९७३-७४ | १८(२), १९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१८:- ऑईल इंजिन.(२७१)<br>परि.क्र.१९:- औषध साठा रजिष्टर २९४ | २ |
| २ | १९७४-७५ | २२ (ब)<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र. २२(ब) :- औषध खरेदीबाबत (६.११७) | १ |
| ३ | १९७७-७८ | ५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.५:अनामत जमा नसतांना रक्कम अदा केलेबाबत(६.७३(ब) | १ |
| ५ | १९७८-७९ | ११,१३(अ,ब) | २ |
| ६ | १९७९-८० | ५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.५: सबसिडीने शेतक-यांना स्प्रेपंप वाटपाबाबत.(६.७९) | १ |
| ७ | १९८०-८१ | ७ (१ ते २) | १ |
| ८ | १९८२-८३ | ५,८,२७<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२७: पावती पुस्तक साठा (६.१३०) | ३ |
| ९ | १९८३-८४ | १८ | १ |
| १० | १९८४-८५ | ५,१९,२७<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.५: हरिजन/आदिवासी घरबांधणीबाबत (६.९७/२९३)<br>परि.क्र१९: अपूर्ण बांधकाम (६.१३७/३२२)<br>परि.क्र.२७: पाणी पुरवठा साठा | ३ |
| ११ | १९८५-८६ | ३,५,१२,१४,<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.५: निविदेची बनावट कागदपत्रे करणेत आली. (६.३२)<br>परि.क्र.१४: शेतकरी निवासस्थान बांधकामातील अनियमितता व खर्च | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | १९८६-८७-८८ | ८ (३)<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.८:मागासवर्गीयांना कौल वाटप योजनेतील अनियमितता(६.१४०) | १ |
| १३ | १९९१-९२ | ४,९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४: पंचायत समिती उपकरातुन ५० टक्के अनुदान (६.८०)<br>परि.क्र.९: अपूर्ण बांधकामाबाबत (६.१३७) | २ |
| १४ | १९९४-९५ | ३ | १ |
| १६ | १९९५-९६ | ५ | १ |
| १७ | १९९६-९७ | ४ | १ |
| १८ | १९९९ - २००० | १०<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१०: प्रलंबित अग्रीम रक्कमेबाबत.(४.१०५(१३) | १ |
| २० | २००० - २००१ | ७,९,१५,१९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.७: निवासस्थान भाडे कमी आकारणीबाबत (४.१८७)<br>परि.क्र.१९:अपूर्ण कामाबाबत (४.१८२) | ४ |
| २१ | २००१ - २००२ | ३,११(२),१८,२६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३:- वाहन क्र.एमएच १५ एए ५०२५ च्या खर्चाबाबत. (४.२५२)(७)<br>परि.क्र.१८- हातपंप/विद्युत पंप थकबाकीबाबत (४.२४९)(१०)<br>परि.क्र.२६- अपुर्ण बांधकामाबाबात.(४.२४९)(७) | ४ |
| २२ | २००२ - २००३ | ४,५,६(ब,क,ड,इ,ई),७(ब,क,ड,इ,ई),९,१४,१५,२१<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.४:- १००% अनुदानावर मागासवर्गीयांना बैलगाडीचे वाटपाबाबत.(४.१३१)<br>परि.क्र.१५ :- प्रलंबित अग्रीम रक्कमेबाबत. (४.२०४(५)) | ८ |
| २३ | २००३ - २००४ | ४,८,१०,११,१६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.४:- १००% अनुदानावर गटई स्टॉल वाटपाबाबत.(४.१३७) | ५ |
| २४ | २००४-०५ | ४,५,१०,११,१३,१७,१८<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.५:- पंचायत समिती उपकरातून खरेदी केलेल्या निलकमल प्लॅस्टीक क्रेट खरेदीबाबत.(४.१८९)<br>परि.क्र.१०:- महत्त्वाच्या नोंदवह्या न ठेवल्याबाबत.(४.३३७)<br>परि.क्र.११:- प्रलंबित अग्रीम रक्कमेबाबत.(४.३३५) | ७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परि.क्र.१८:- अपूर्ण जवाहर विहीरींबाबत.(४.३३२) | |
| २५ | २००५ – २००६ | ४,७,९,१२,१३,१६,१७,१९,२० पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्र.१२ :- प्रलंबित अग्रीम रक्कमेबाबत (४.७३१)(९) परि.क्र.१९ :- अपूर्ण बांधकामाबाबत (ल.पा.) ४(७२८)(२८) | ९ |
| **सन २००६ – २००७ चा लेखापरीक्षण अहवाल.** | | | |
| परिच्छेद क्रमांक ४ :- पंचायत समिती सेसमधून केलेल्या वाहन खर्चाबाबत | | | |
| परिच्छेद क्रमांक ५ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ६ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ७ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ८ :- पंचायत समिती सेसमधून खरेदी करण्यात आलेल्या प्लॅस्टीक क्रेटसबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ९ :- जातवैधता प्रमाणपत्राबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १० :- अपूर्ण बांधकामाबाबत (ल.पा.) पं.स.चांदवड, (ज.रो.यो.विहीरी) | | | |
| परिच्छेद क्रमांक ११ :- अपूर्ण बांधकामाबाबत (ल.पा.) पं.स.चांदवड, (गावतळे रो.ह.यो.) | | | |
| परिच्छेद क्रमांक १२(१) :- रोजगार हमी योजनेतंर्गत जवाहर विहिरींच्या व विशेष घटक योजना / आ.उ.क्षे. बाहेरील विहीरींच्या कामाबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १३:- अपूर्ण बांधकामाबाबत (कृषि विभाग, चांदवड) | | | |
| परिच्छेद क्रमांक १४ :- लघुपाटबंधारे उपविभाग, चांदवड नोंदवह्या अपूर्ण असलेबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १५ :- अपूर्ण बांधकामाबाबत (ल.पा.) पं.स.चांदवड (१२ वा वित्त आयोग) | | | |
| परिच्छेद क्रमांक १६ :- अपूर्ण बांधकामाबाबत (ल.पा.) पं.स.चांदवड (१२ वा वित्त आयोग) | | | |
| परिच्छेद क्रमांक १८ :- अनामत नोंदवहीबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १९ :- अल्पबचत अनुदानाबाबत (पं.स. चांदवड) | | | |
| परिच्छेद क्रमांक २१ :- हातपंप, विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक २२ :- पोच पावत्या उपलब्ध न करणेबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक २३ :- चांदवड पंचायत समिती अंतर्गत शासनाच्या अनुदानातून बांधलेल्या निवासस्थानाबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक २४ :- निवासस्थान नोंदवहीबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक २६ (१,३,४) :- लेखापरीक्षणास दप्तर उपलब्ध न झालेबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक २७ :- वार्षिक लेखा | | | |

**टिप :-** उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांच्या संदर्भात त्या-त्या वर्षाचे पुढील अभिप्रायामध्ये नमुद करण्यांत आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यांत यावेत.

## भाग दुसरा
## चालु लेखापरीक्षण

## मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(अ) खालील अनियमितता..

(जे प्रदान वैधानिक तरतुदी विरुध्द करण्यांत आले आहे, असे प्रदान.)

**परिच्छेद क्रमांक ३ :- अदांजपत्रकाबाबत.**

पंचायत समिती चांदवड, जिल्हा नाशिकचे सन २००७ – २००८ चे मूळ अंदाजपत्रक व सुधारित अंदाजपत्रक यांचा तपशील खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे. सुधारित अंदाजपत्रकात पंचायत समिती ठराव क्र. ६२, दिनांक १.२.२००८ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. प्रत्येक शिर्षनिहाय केलेल्या तरतुदीचा व झालेल्या प्रत्यक्ष खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शिर्ष | मुळ तरतुद | सुधारित तरतुद | खर्च रुपये | फरक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ शिक्षण | २५,००० | २५,००० | ४,८०० | (-) २०,२०० |
| २ | ४ बांधकाम | ४५,००० | ४५,००० | २५,००० | (-) २०,००० |
| ३ | ८ आरोग्य | १०,००० | १०,००० | १०,००० | - |
| ४ | ११ शेती | २५,००० | २५,००० | २४,६५० | (-) ३५० |
| ५ | १२ पशुसंवर्धन | १५,००० | १५,००० | १४,९४० | (-) ६० |
| ६ | १४ समाजकल्याण | ६०,००० | ६०,००० | ५९,४५६ | (-) ५४४ |
| ७ | २० संकीर्ण (मबाक) | ३०,००० | ३०,००० | २२,८८० | (-) ७,१२० |
| ८ | पं.स.जीप इंधन दुरुस्ती | ९०,००० | ९०,००० | ६६,९८९ | (-) २३,०१४ |
| | एकूण | ३,००,००० | ३,००,००० | २,२८,७१५ | |

उपरोक्त तरतूद व खर्चाचे तपशीलावरुन पंचायत समितीचे सन २००७ – २००८ चे अंदाजपत्रक नियोजनपूर्वक व वस्तुस्थितीस धरुन केलेले नसल्याचे स्पष्ट होते. अहवालासोबतच्या जमा खर्चाचे विवरणपत्र क्र. १ नुसार पंचायत समिती सेसची दि. १.४.२००७ रोजी वर्षाची आरंभीची शिल्लक रुपये ३१,६१७/- असून वित्त प्रेषणासह भांडवली जमा (सुरुवातीच्या शिल्लकेसह) गृहित धरुन एकूण शिल्लक रुपये ३,०९,०१७/-

इतकी होती. मात्र उपरोक्त अंदाजपत्रक रुपये ३,००,०००/- चे म्हणजे रुपये ७१,२८५/- ने कमी रक्कमेचे केले आहे. याबाबत पंचायत समिती सभेचे क्षमापन घ्यावे.

तसेच ८ सार्वजनिक आरोग्य या बाबीवर तरतुद करण्यात आली असून अनुदानाअभावी खर्च न केलेले दिसून येते. अ.क्र. १,२, ४ ते ८ यावर तरतुद करण्यात आलेल्या रक्कमेपेक्षा कमी खर्च केला आहे. याबाबत पंचायत समिती सभेचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- अपंग लाभार्थ्यांना सायकल वाटपाबाबत.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजूरी | ठराव क्रमांक ६३ दिनांक १.२.२००८ |
| तांत्रिक मंजूरी | घेतलेली नाही |
| खर्चाचा तपशिल | प्र.क्र. ११, दि. ३१.३.२००८ रक्कम रुपये १०,५७६/- मिना एंटरप्रायझेस, पिंपळगाव (ब), दोन नग |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सदर सायकली लेखापरीक्षण कालावधी पावेतो वाटप केलेले नसल्याचे आढळून आले. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही. सदर सायकलींचे त्वरीत वाटप करुन उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात यावे.

२) गटविकास अधिकारी यांची तांत्रिक मंजूरी घेण्यात आलेली नाही. तांत्रिक मंजूरी घेऊन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावी.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावे. तोपावेतो खर्च रक्कम रुपये १०,५७६/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
१४ समाजकल्याण
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये १०,५७६/-

---

**परिच्छेद क्रमांक ५ :- ग्लुकोमिटर खेरदीबाबत.**

प्रमाणक क्रमांक ५ दिनांक १८.३.२००८ रक्कम रुपये १०,०००/- मे. अजंठा मेडीकल व जनरल स्टोअर्स, मालेगाव यांचेकडून ५ नग ग्लुकोमिटर खरेदी करुन ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांना वाटप केलेले आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सदर योजनेस गटविकास अधिकारी यांनी तांत्रिक मंजूरी दिलेली नाही.

२) वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २.१.१९९२ नुसार थेट उत्पादक कंपनीकडून खरेदी करण्यात आलेली नाही.

३) सदरचे ग्लुकोमिटर आयएसआय मार्कचे असल्याचे बिलावर नमुद नाही. त्यामुळे त्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे. तोपावेतो खर्च रक्कम रुपये १०,०००/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये १०,०००/-

---

## मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(ब) खालील अनियमितता..

(कोणत्याही व्यक्तींच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तुणुकीमुळे झालेले नुकसान)

---

**परिच्छेद क्रमांक ६ :- हातपंप, विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत.**

पंचायत समिती, चांदवडच्या सन २००७ – २००८ साठीच्या हातपंप / विद्युतपंप देखभाल दुरुस्तीची वर्गणी नोंदवहीची पडताळणी केली असता या सोबतच्या परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दर्शविणेत आलेप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर हातपंप देखभाल दुरुस्ती वर्गणी रक्कम रुपये १,८२,१६७/- व विद्युतपंपाची वर्गणी रक्कम रुपये १,०१,१५४/- अशी एकुण रक्कम रुपये २,८३,३२१/- अदयापही ग्रामपंचायतीकडून वसुल करणे बाकी आहे.

याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे आदेश क्रमांक भुजल १०९५/ प्र.क्र. २१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप / विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्तीची प्रलंबित वर्गणी संबंधित ग्रामपंचायतीकडून रोख स्वरुपात अथवा देय अनुदानातुन सत्वर वसुल करावी व पुर्तता दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ७ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती चांदवड येथील वाहन क्र. एम.एच.१५/ए.ए.५०६९ च्या वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली.

लेखापरीक्षण वर्षात वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरले असून सोबतच्या परिशिष्ट क्र. २ मध्ये त्याचा तपशील जोडला आहे.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय, वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र-३३/सेवा-५/दि.८.७.१९९५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर ५१४५ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये ४१,१६०/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये ४१,१६०/-

---

**परिच्छेद क्रमांक ८ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती चांदवड येथील वाहन क्र. एम.एच.१५/ए.ए.५०२५ च्या वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. लेखापरीक्षण वर्षात वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरले असून सोबतच्या परिशिष्ट क्र. ३ मध्ये त्याचा तपशील जोडला आहे. सदरचे वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरण्यापूर्वी सक्षम वरिष्ठ अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर ४८१३ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये ३८,५०४/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये ३८,५०४/-
पंचायत समिती सेस

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती चांदवड येथील एकात्मिक बाल विकास सेवा विभाग यांची वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. आर्थिक वर्षात विभागाचे वाहन एम. एच. १५ ए ४६६१ कार्यक्षेत्राबाहेर फिरल्याच्या नोंदींचा तपशील सोबतच्या परिशिष्ट क्र. ४ मध्ये दिला आहे. वाहन वापरण्यापूर्वी सक्षम वरिष्ठ अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर २२६० ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये १८,०८०/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये १८,०८०/-

---

**परिच्छेद क्रमांक १० :- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू न केलेबाबत.**

पंचायत समिती, चांदवड सन २००७ – २००८ च्या लेखापरीक्षणात ग्रामसेवक आस्थापना लेख्यांची तपासणी केली असता, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी कंत्राटी / मानधनावर लागलेल्या परंतु १ नोव्हेंबर २००५ नंतर कायम केलेल्या, या अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक ५ नुसार नमुद कर्मचा-यांना जिल्हापरिषद, नाशिक यांनी भविष्य निर्वाह निधी क्रमांक दिलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४/दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ व शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा-४/ दिनांक ७ जुलै २००७ अन्वये जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ लागु होत नाही. त्यामुहे परिशिष्टात नमुद केलेल्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये होणारी कपात ही चुकीची असून, त्यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार स्तर १ लागु होतो. त्यात त्यांची मुळ वेतन + महागाई वेतन + महागाई भत्ता या रक्कमेच्या १० टक्के रक्कम कपात करुन ठेव या शिर्षाखाली जमा करावयाची आहे.

२) जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांच्याबाबत अद्यापही परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची रक्कम कपात करण्यात येत नसल्याने याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे दोन्हीही कर्मचा-यांची शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे अंशदान कपात करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

ग्रामपंचायत आस्थापना

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू न केलेबाबत.**

पंचायत समिती, चांदवड सन २००७ – २००८ च्या लेखापरीक्षणात शिक्षण आस्थापना लेख्यांची तपासणी केली असता, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी कंत्राटी / मानधनावर लागलेल्या परंतु १ नोव्हेंबर २००५ नंतर कायम केलेल्या, या अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक ६ नुसार नमुद कर्मचा-यांना जिल्हापरिषद, नाशिक यांनी भविष्य निर्वाह निधी क्रमांक दिलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४/दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ व शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा-४/ दिनांक ७ जुलै २००७ अन्वये जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ लागु होत नाही. त्यामुहे परिशिष्टात नमुद केलेल्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये होणारी कपात ही चुकीची असून, त्यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार स्तर १ लागु होतो. त्यात त्यांची मुळ वेतन + महागाई वेतन + महागाई भत्ता या रक्कमेच्या १० टक्के रक्कम कपात करुन ठेव या शिर्षाखाली जमा करावयाची आहे.

२) जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांच्याबाबत अद्यापही परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची रक्कम कपात करण्यात येत नसल्याने याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे दोन्हीही कर्मचा-यांची शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे अंशदान कपात करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

शिक्षण विभाग आस्थापना

---

## <u>मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(क) खालील अनियमितता...</u>

एखादया व्यक्तीस तिला मिळालेली रक्कम लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक होते परंतू जी अशी दाखविण्यांत आली नाही अशी रक्कम

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- कर्तव्यस्थानी दिलेल्या निवासस्थानासाठी अनुज्ञप्ती शुल्काची वसूली न केल्याबाबत.**

पंचायत समिती, चांदवड येथील सन २००७ – २००८ लेखापरीक्षणामध्ये अनुज्ञप्ती शुल्क वसूली नोंदवहीची पडताळणी केली असता व अर्धसमास पत्र क्रमांक २५ दिनांक १४.८.२००८ अन्वये मागितलेल्या माहितीनुसार श्री. एम. डी. पेंढारकर, माजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चांदवड यांच्याकडे अनुज्ञप्ती शुल्क रक्कम रुपये १०,१५५/- व श्री. एम. डी. डगळे, माजी गटशिक्षण अधिकारी, चांदवड यांचेकडे रक्कम रुपये २,८००/- अशी एकूण रुपये १२,९५५/- थकबाकी येणे असल्याचे दिसून आले.

शासन निर्णय, क्र.घभाव-२०००/प्र.क्र.९७/२०००/सेवा-२५/दि.१७.१.२००१ तसेच मुंबई नागरी सेवा नियम १९५९ खंड - १ मधील नियम ८४९ (बी) च्या तरतुदीनुसार कर्तव्यस्थानी दिलेल्या निवासापोटी एकूण वित्तलब्धीच्या १०% किंवा निवासस्थानाच्या प्रमाणित भाडे यांपैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ती शुल्क द्यावे लागेल, अशी तरतुद असतांनाही सदरची रक्कम प्रतिमाह वेतनातून कपात करण्यात आलेली नाही. थकीत येणे रक्कम रुपये १२,९५५/- त्वरीत वसूल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भराणा करावे व तसे अनुपालन लेखापरीक्षणात सादर करावे.

---

## <u>मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(ड) खालील अनियमितता...</u>

(अ,ब,क व्यतीरिक्त लेख्यांमध्ये आढळून आलेल्या इतर अनियमितता.)

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- प्रलंबित अग्रिम रक्कमेबाबत.**

पंचायत समिती चांदवड सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचे वेळी अग्रिम नोंदवहीची पडताळणी केली असता विवरणपत्र क्रमांक ४ नुसार कर्मचा-यांकडील

धान्य, सण, खातेनिहाय अग्रिम रक्कम रुपये ३,८१,८७५/- प्रलंबित असलेचे निदर्शनास येते.

विवरणपत्रातील नमुद रक्कमेपैकी रुपये १,१२५/- ही सन २००५ – २००६ पासून प्रलंबित असून, ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र. परास ६९२/ झेडपीए/४०९/प्र.क्र. १३७६/ दिनांक १०.६.१९९२ नुसार कार्यवाही करुन सदरची रक्कम वसूल करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- बस्करपट्टया खरेदीबाबत.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजूरी | पंचायत समिती सभा ठराव क्र. ६३ दिनांक १.२.२००८ |
| तांत्रिक मंजूरी | -। |
| खर्चाचा तपशिल | प्रमाणक क्रमांक ६ दिनांक १८.३.२००८ रक्कम रुपये २२,२८०/- प्रशासन अधिकारी, नाशिकरोड यांचेकडून ८८ नग बस्करपट्टया अंगणवाड्यांसाठी प्रती नग रुपये २६०/- प्रमाणे |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सदर खरेदी करण्यापूर्वी किती अंगणवाड्या आहेत, त्यासाठी किती नग बस्करपट्टयांची आवश्यकता आहे याबाबत मागणीपत्रे घेण्यात आलेली नाहीत. त्यामुळे मागणीनुसार आवश्यक तेवढयाच बस्करपट्टयांची खरेदी केली किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

२) सदर योजनेस गटविकास अधिकारी यांची तांत्रिक मंजूरी घेण्यांत आलेली नाही. सदर अनियमिततेस सक्षम अधिका-यांचे क्षमपान घेण्यांत यावे.

३) सदरच्या बस्करपट्टया लेखापरीक्षण कालावधीपावेतो (ऑगस्ट २००८ पर्यंत) प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे सन २००७ – २००८ वर्षात लाभार्थ्यांना लाभ मिळू शकलेला नाही. तसेच बस्करपट्टया प्राप्त झालेल्या नसल्याने पंचायत समितीचा निधी नाहक गुंतवून पडलेला आहे व त्यामुळे योजनेचा मुळ उद्देश सफल झालेला नाही. तरी सदरबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

तसेच बस्करपट्टया त्वरीत प्राप्त करुन त्यांचे वाटप व विनियोग दाखले लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे. तोपावेतो खर्च रक्कम रुपये २२,२८०/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
एकात्मिक बालविकास योजना
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये २२,८८०/-

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- ५० % अनुदानाने नॅपसॅक स्प्रेपंप वाटपाबाबत.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजूरी | पंचायत समिती सभा ठराव क्र. ६३ दिनांक १.२.२००८ |
| तांत्रिक मंजूरी | गटविकास अधिकारी, पं.स.चांदवड पत्र क्र. २०१ दि. १०.३.२००८ |
| खर्चाचा तपशिल | प्र.क्र.७ दि. २८.३.२००८ रक्कम रु. २४,६५०/-<br>महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचेकडून ५८ नग स्प्रेपंप प्रती नग रुपये ८५०/- प्रमाणे ५०% रक्कम अदा. |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

लाभार्थ्यांनी यापूर्वी लाभ घेतलेला नसल्याबाबत वाटप प्रकरणांवर ग्रामसेवक यांच्या स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या नाहीत. तसे प्रमाणित करुन अनुपालन दाखविण्यांत यावे. तो पावेतो खर्च रक्कम रुपये २४,६५०/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
कृषि विभाग,
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये २४,६५०/-

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- प्रवासभत्ते देयकांबाबतची नियंत्रण नोंदवही न ठेवण्याबाबत.**

पंचायत समिती चांदवड सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणात जिल्हानिधी व अभिकरण प्रमाणकांचे लेखापरीक्षण करतांना रजा प्रवास सवलत, स्वग्राम रजा प्रवास सवलत, प्रवास भत्ते देयके प्रदान करण्याअगोदर नियंत्रण नोंदवहीत नोंद करुन देयके प्रदानासाठी सादर करणे आवश्यक होते. त्यामुळे एकच देयक दुबार प्रदान न होता अतिप्रदान होण्याचे टाळले जाऊ शकते. परंतु पंचायत समिती कार्यालयातील कोणत्याही आस्थापनेवर अशी नोंदवही ठेवलेली नसल्याने एकच देयक दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे सदरची नोंदवही सन २००८ – २००९ पासून अद्ययावत करुन पुर्तता दर्शवावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक १७ :- अनामत नोंदवहीबाबत.</u>**

पंचायत समिती, चांदवड कडील सन २००७ – २००८ चे अनामत नोंदवहीची पडताळणी केली असता, अहवालासोबत विवरणपत्र क्रमांक ३ मध्ये नमुद केल्यानुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर एकूण अनामत रक्कम रुपये १९,१३,४९८/- शिल्लक आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम २१९ अन्वये ३ वर्षाच्या वरील मुदतीच्या अनामत ठेवीच्या रक्कमा व्यपगत करणे आवश्यक असतांना वरील नमुद केलेली सन २००२ – २००३ ते २००४ – २००५ ची इतर अनामत रक्कम रुपये १,२६,७९५/- व्यपगत केली नसल्याचे आढळून आले आहे. तरी याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे क्षमापन घेऊन योग्य तो खुलासा करावा आणि त्याबाबतची आवश्यक कार्यवाही करुन पुर्तता दाखवावी.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम २२० अन्वये ३ वर्षापर्यंत अदा न केलेल्या व व्यपगतही न केलेल्या रुपये १,२६,७९५/- वरील अनामत रक्कमांचे विवरण मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक यांचेकडे दिनांक ३१.३.२००८ पूर्वी पाठविणे आवश्यक असताना याविषयी सन २००२ ते २००५ ची माहिती पाठविण्यांत आलेली नाही. याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे क्षमापन घेऊन योग्य ती कार्यवाही केल्याचे लेखापरीक्षणात दाखवावे.

३) सन २००२-२००३ मधील रुपये ५४,०००/- सुलभ शौचालय अनुदानाचे धनादेश रद्द करुन अनामत सदरी जमा केले आहेत. सदरची अनुदाने त्या वर्षाअखेरीस अखर्चित राहिली असतांना त्याच वर्षाअखेर शासन सदरी योग्य त्या शिर्षाखाली भरणा करणे आवश्यक होते. तथापि मार्च २००८ अखेर पावेतो शासन अनुदानाची रक्कम नियमबाह्यपणे अनामत सदरी ठेवण्यांत आलेली आहे. सदरबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी व त्वरीत सदरची रक्कम योग्य त्या शासन लेखाशिर्षाखाली भरणा करुन संबंधित प्रशासकीय विभागाचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणात दाखविण्यांत यावे.

उपरोक्त नमुद अनामत सदरीच्या रक्कमा संबंधित शिर्षाखाली भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत...**

पंचायत समिती, चांदवडचे सन २००७ – २००८ या कालावधीतील खालील कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले घेणेत आलेले नाहीत.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. विष्णु नामदेव गायकवाड | पशुधन पर्यवेक्षक, देवरगांव |
| २ | श्री. ए. जी. तांबोळी | कनिष्ठ सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र, तळेगांव |
| ३ | श्री. व्ही. एस. गवळी | शाखा अभियंता (ल.पा.) |
| ४ | श्री. एस. पी. घुले | शाखा अभियंता (ल.पा.) |
| ५ | श्री. जे. टी. पाटील | कनिष्ठ अभियंता (ल.पा.) |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४३ (३) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणेत आलेले नाहीत. तरी उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- लघुपाटबंधारे उपविभाग, चांदवड यांचेकडील नोंदवही क्रमांक ४१ बाबत.**

लघुपाटबंधारे उपविभाग, चांदवड यांचेकडील नमुना क्रमांक ४१ ची पडताळणी केली असता सदरच्या नोंदवहीतील पाझर तलाव यांचे संदर्भात संपादित / प्राप्त जमिनींचे ७/१२ उतारे उपलब्ध करुन त्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या झालेल्या असल्याबाबत उपअभियंता (लघुपाटबंधारे) उपविभाग, चांदवड यांनी प्रमाणित करुन तसे अनुपालन दाखवावे.

याबाबत मागील सन २००६ – २००७ चे अहवालात क्रमांक १४ अन्वये आक्षेप नोंदवूनही कार्यवाही झालेली नाही.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- बांधकाम उपविभाग (इ व द) नोंदवह्यांबाबत**

१) नोंदवही क्रमांक ३९ :- मालमत्ता नोंदवहीत बांधलेल्या इमारतीच्या काही नोंदी घेतल्या असून त्यातील रकाने ७ ते १३ अपूर्ण आहेत.

२) नमुना क्रमांक ४० :- नोंदवही अपूर्ण असून ती पूर्ण करुन रस्त्याच्या नोंदी अद्ययावत असल्याची खात्री पटवावी.
३) नमुना क्रमांक ४१ :- मध्ये रिकाम्या जागेच्या ठिकाणी ७/१२ उतारे प्राप्त करुन त्या जागेवर अतिक्रमण झालेले नसल्याने उपअभियंता, बांधकाम विभाग ह्यांनी प्रमाणित केलेले नाही.
४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ चे नियम ९८ अन्वये स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र सक्षम कार्यालयाला कळविणबाबतची खात्री पटवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- पूर्ण विहिरींचे ७/१२ उतारे न घेणेबाबत. (जरोयो)**

श्रीमती. राहीबाई रामभाऊ पवार, वाद यांनी जवाहर रोजगार योजनेतून विहिरीचे काम पूर्ण केलेले आहेत. तथापि लाभार्थ्याने पूर्ण केलेल्या विहिरींच्या नोंदीची ७/१२ उतारा-यावर नोंद घेण्यांत आलेली नाही. तरी नोंदीसह ७/१२ उतारे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यांत यावेत.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी याने प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती चांदवड यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) आणि उपदान व अंशराशीकरण नोंदवही (नमुना ए.पी.पी. १०) यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रत्येक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधीच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी,

अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास प्रत्येक वर्षी जीवीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवीत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या निवृत्ती वेतन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे, असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे. असे प्रमाणपत्र देण्यात कसून झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबद्ध केलेली नाहीत.

५. निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भाकिंत लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी व श्रम व्यर्थ खर्च करावे लागत आहेत.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी.

उपरोकत आक्षेपांबाबत अंतर्गत लेखापरीक्षणाकडून उचित पडताळणी करुन त्यांचा अहवाल व त्यावरील कार्यवाही अहवालासह निवृत्ती वेतन लेखा परीक्षा नोंदवही व सर्व आदेश नोंदवहीसह अद्ययावत पुर्तता लेखापरीक्षणांस दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- करारपत्राची नोंदवही न ठेवणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम १४७ नुसार प्रत्येक मंजूर करारांची नमुना नंबर ४८ मध्ये नोंदवही परीरक्षीत करुन त्यामध्ये नोंद घेऊन प्रत्येक नोंदीखाली लेखाधिका-याने स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे पंचायत समितीने

आजपावेतो कोणत्या कामासाठी कोणत्या मक्तेदाराबरोबर करार केलेले होते, करारानुसार विहित वेळेत काम पूर्ण झाले किंवा कसे इत्यादीबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

तरी आजपावेतो केलेल्या कराराबाबतच्या नोंदी नमुना नंबर ४८ मध्ये घेऊन त्या नोंदीखाली सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- दप्तर तपासणी लक्षांकाबाबत.**

सन २००७ – २००८ वर्षात ग्रामपंचायत विभागाकडील क्षेत्रीय अधिकारी यांना किती दप्तर तपासणीचे लक्षांक देण्यांत आले होते, किती पूर्ण केले, त्यात आढळून आलेल्या गंभीर अनियमितता व केलेली कार्यवाही याबाबत अर्धसमासिय पत्र क्रमांक १ दिनांक ११.९.२००८ अन्वये माहिती मागविण्यांत आली. सदर तपशीलान्वये सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक ७ नुसार दप्तर तपासणीचे कमी उद्दिष्ट साध्य पार पडलेले असल्याचे दिसून येते.

दप्तर तपासणी हे प्रशासनाच्या प्रभावी नियंत्रणाचा भाग असून जो पूर्ण करणे आवश्यक आहे, जेणेकरुन संभाव्य होणारे गैरव्यवहारी प्रकार यावर वेळीच नियंत्रणात ठेवणे शक्य होईल. कमी दप्तर तपासणी साध्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरिक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतून धान्य वाटप कुपनांबाबत.**

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना नाशिक जिल्ह्यात सन २००२ – २००३ ते २००७ – २००८ या पाच वर्षात राबविण्यांत आली. या पाच वर्षात ग्रामपंचायतीनिहाय किती क्विंटल धान्याचे वाटप केले व शिल्लक कुपन यांची वर्ष निहाय माहिती अर्धसमासिय पत्र क्रमांक २ दिनांक २३.९.२००८ (लेखापरीक्षण अहवाल अंतिमीकरणाचेवेळी) मागविण्यांत आली होती. तथापि सदरची माहिती लेखापरीक्षणांस उपलब्ध करुन देणेऐवजी या योजनेचे खाजगी चार्टड अकाऊंटन्ट कडून लेखापरीक्षण होत असल्याने माहिती देता येत नाही असे नमुद करुन सोबत दिनांक २७.१२.२००१ च्या खाजगी लेखापरीक्षणाबाबत आदेशाची प्रत जोडलेली आहे.

या योजनेचे ग्रामपंचायत पातळीवर स्थानिक निधी लेखा विभागाकडून लेखापरीक्षण होत आहे. एकत्रित आढाव्याच्या उद्देशाने ही माहिती मागविण्यात आली होती. लेखासंहिता नियम क्रमांक ६८ नुसार संविधानिक लेखापरीक्षकांनी मागतिलेली कोणतीही माहिती कमीत कमी व्यवहार्य विलंबाने लेखापरीक्षणांस सादर करणे विभाग प्रमुखांचे कर्तव्य असतांना, माहिती लेखापरीक्षणांस सादर करण्यांस टाळाटाळ करणेबाबत

संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी व अनुपालन लेखापरीक्षणासं दाखविण्यांत यावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २६:- अपूर्ण बांधकामाबाबत (लघुपाटबंधारे) पंचायत समिती, चांदवड</u>**

(जवाहर रोजगार योजना विहीरी)

१) लेखापरीक्षण अहवालासोबत जोडलेले विवरणपत्र क्र. २(१) मध्ये नमूद केलेप्रमाणे जवाहर रोजगार योजना विहीरी कामे अपूर्ण आहेत. अपूर्ण कामांवर मार्च - २००८ अखेर रुपये ९५,४२१/- इतका खर्च झालेला आहे. कामे वेळीच पूर्ण न केलेने ग्रामीण भागातील जनतेला त्याचा फायदा मिळू शकला नाही.

२) विहीरीची एकूण ४ कामे अपूर्ण आहेत. शासनाने ज्या उददेशाने अनुदान वितरीत केले आहे त्यानुसार विहीरीची कामे विहीत मुदतीत पूर्ण होणे आवश्यक ठरते. परंतु कामे अपूर्ण राहिल्याने अनुदानाचा वेळीच उपयोग होत नसल्याचे दिसून येते.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५७ व १९७ नुसार नमुना ४९ व ६९ मध्ये आवश्यक त्या नोंदी अदयावत ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे लघुपाटबंधारे उपविभाग, चांदवड यांनी दिलेली अपूर्ण कामांची माहिती अचूक असल्याची खात्री देता येत नाही. सबब उपरोक्त नोंदवहया अदयावत ठेवून तसे प्रमाणित करुन अनुपालन दर्शवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २७:- अपूर्ण बांधकामाबाबत (लघुपाटबंधारे) पंचायत समिती, चांदवड</u>**

(गावतळे / पिण्याच्या पाण्याच्या विहीरी रोजगार हमी योजना)

१) लेखापरीक्षण अहवालासोबत जोडलेले विवरणपत्र क्र. २ (२) मध्ये नमूद केलेप्रमाणे गावतळ्यांची काम अपूर्ण आहेत. अपूर्ण २ कामावर मार्च-२००८ अखेर रु. १०,२५,०००/- इतका खर्च झालेला आहे. कामे वेळीच पूर्ण न केलेने ग्रामीण भागातील जनतेला त्याचा फायदा मिळू शकला नाही.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५७ व १९७ नुसार नमुना ४९ व ६९ मध्ये आवश्यक त्या नोंदी अदयावत ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे लघुपाटबंधारे उपविभाग, चांदवड यांनी दिलेली अपूर्ण कामांची माहिती अचूक असल्याची खात्री देता येत नाही. सबब उपरोक्त नोंदवहया अद्ययावत ठेवून तसे प्रमाणित करावे.

३) विवरणातील नमुद केलेले गावतळे भुल्याणे व इंद्रायवाडी (वडबारे) चे काम दिनांक ४.६.२००३ व दिनांक ३१.३.१९९५ रोजी सुरु झाले आहे. सन २००८ पर्यंत ५ व १३ वर्षे पूर्ण होऊनही अद्याप काम अपूर्ण आहे. आतापर्यंत कामावर झालेला एकूण खर्च रुपये १०,२५,०००/- इतका आहे. उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे नियम १५७-

१९७ नुसार अपूर्ण कामांच्या नोंदी अपूर्ण असल्याने साठवण स्थितीबाबत अभिप्राय देता येत नाहीत. या कामांच्या सुस्थिती व उपयोगितेबाबत दक्षता व गुण नियंत्रक पथकाचा तपासणी अहवाल घेऊन पुर्तता दर्शवावी; अन्यथा सदरचा खर्च वाया गेला, असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

**परिच्छेद क्रमांक २८ :- कृषी विभाग अपूर्ण विहीरीचे बांधकामाबाबत.**

अहवालासोबत जोडलेले विवरणपत्र क्रमांक २ (३) मध्ये नमुद केल्याप्रमाणे दोन कामे अपूर्ण आहेत. अपूर्ण कामावर माहे मार्च २००८ अखेर रुपये ४९,९००/- इतका खर्च झालेला आहे. कामे वेळीची पूर्ण न केलेने लाभार्थ्यास त्याचा फायदा मिळून शकला नाही व भौतिक उद्दीष्टही साध्य झालेले नाही.

तरी अपूर्ण विहीरींची कामे पूर्ण करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

**परिच्छेद क्रमांक २९ :- दलित वस्ती सुधार योजना अपूर्ण कामांबाबत.**

सोबत जोडलेले विवरण पत्र क्रमांक २ (४) नुसार दलित वस्ती सुधार योजनेतील खालीलप्रमाणे कामे माहे मार्च २००८ अखेर अपूर्ण असून त्यावर खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ. क्र. | एकूण ग्रा.पं. संख्या | वर्ष | वितरीत अनुदान (रुपये) | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ ला हप्ता ४० % | २ रा हप्ता ४०% | ३ रा हप्ता २०% | |
| १ | ८ ग्रा.पं. | २००४-०५ | ५,०८,००० | १,५४,००० | - | अपूर्ण |
| २ | ५ ग्रा.पं. | २००५-०६ | ४,७७,२०० | ८०,००० | - | अपूर्ण |
| ३ | ६ ग्रा.पं. | २००६-०७ | ४,६२,८०० | ३,१६,००० | - | अपूर्ण |
| ४ | २८ ग्रा.पं. | २००७-०८ | १८,६०,००० | ८०,००० | - | अपूर्ण |
| | | **एकूण** | **३३,०८,०००** | **६,३०,०००** | | |

वरीलप्रमाणे प्रथम मागील जूनी कामे पूर्ण करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे अपूर्ण कामांवरील खर्च भविष्यात नैसर्गिक घटकांचा परिणाम होऊन खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अपूर्ण कामे प्राधान्य क्रमाने पूर्ण करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

**परिच्छेद क्रमांक ३० :- वार्षिक लेखा**

या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांवरील संपूर्ण पुर्ततेच्या अधिन राहुन आणि लेखापरिक्षीत निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांमध्ये अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता स्पष्ट झालेली नाही यास अधीन राहून, या पंचायत समितीचे सन २००६-२००७ चे वार्षिक लेखे बरोबर असल्याचे प्रमाणीत करणेत येते.

---

**परिच्छेद क्रमांक ३१ :- अनुपालन व पोहोच.**

या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन अहवाल, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे, प्रस्तुत लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झालेपासुन चार महिन्याच्या आत, पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यांत यावा. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवुन पोहोच देणेत यावी.

(वि.ए.कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत सविनय सादर :-**

१) मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई (पत्राने)
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
३) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
४) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
५) मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, नवीमुंबई
२) म. गटविकास अधिकारी, पंचायत समिती चांदवड, जिल्हा नाशिक

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक